**राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १७२८/२००७.**

श्रीमती केशरबाई फागू लांबकासे,
मु. नवाटोला (पलखेडा),
पो. तिल्ली मोहगांव, ता. गोरेगांव,
जिल्हा गोंदिया - ४४१ ८०१. ..... **अपीलकर्ती**

**वि रु ध्द**

श्री. पि. के. क्षिरसागर,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
तहसीलदार, गोरेगांव.
जिल्हा गोंदिया.

श्री. पी.एस.नंदनवार,
जनमाहिती अधिकारी तथा
नायब तहसीलदार,
गोरेगांव, गोंदिया. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ९.७.२००८)**

**नि र्ण य**

अपीलकर्ती यांनी दिनांक २२.५.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ९.७.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ती व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ती यांनी दिनांक ४.१२.२००७ रोजी माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, गोरेगांव यांच्याकडे शेरा कॉलम मध्ये असलेल्या नावांची दुरुस्ती करुन, कापून देणेबाबत फेरफार घेणेबाबत. माहितीचा कालावधी ९.१.१९८३ ते आजपर्यंत. आदिवासीच्या जमिनीवर गैरआदिवासी कुवरलाल पटले हा बळजबरीने पुन्हा कब्जा करण्याचे बेतात आहे. सदरची माहिती व्यक्तिशः उपस्थित राहून घेणार असे नमुद केलेले आहे. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक २२.१२.२००६ रोजी जनमाहिती अधिकारी तथा तहसीलदार, गोरेगांव यांनी

... २

अपीलकर्ती यांना त्यांचे नावाची नोंद आहे ती कमी करता येत नाही असे कळविलेले दिसून येते. त्यानंतर अपीलकर्ती यांनी दिनांक २२.१.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक २५.११.२००७ रोजी पारित केलेला दिसतो. अपीलकर्ती यांनी अनेक अर्ज माहितीच्या अधिकारामध्ये केलेले आहेत व वेळोवेळी त्यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु अपीलकर्ती यांचे म्हणणे असे आहे की, दिनांक ३.९.२००७ रोजी "माझ्या वडिलांची शेती मौजा पलखेडा या गावी होती. माझ्या वडीलांनी ती शेती गट नं. ४९८/१ आराजी १.६९ रुपये १५००/- दिनांक १४.३.१९७४ ला विक्री केली होती. ती जमीन भय्यालाल मोतीराम पटले, रा. तिल्ली मोहगांव यांनी खरेदी केली होती. दिनांक ९.१.१९८३ ला ती जमीन आदिवासीची हलबी समाजाची आहे म्हणून भैय्यालाल पटले यांनी आम्हाला पाच पंचासमोर पंच फैसला करुन नगदी रुपये १२००/- घेऊन परत केली. फक्त आम्ही तलाठयाकडे जाऊन रेकार्डवर दुरुस्ती केली नाही. हया जमिनीवर भैय्यालालच्या मरणानंतर त्याच्या मुला बाळाचे नांव दर्ज झालेत. हया जमिनीवर आताही आमचाच कब्जा व जोत आमचीच चालू आहे. फक्त त्यांचा नांव कमी करणे आहे. सध्या गट नंबर बदलले असून सध्या चालू स्थितीत गट नंबर ४११ वर्ग ची ची जमीन हे. आर. १.६९ हे आहे. यावरुन असे दिसून येते की, अपीलकर्ती यांनी त्यांचे नावावर जमीन करुन पाहिजे आहे. परंतु माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये अशा प्रकारे कारवाई करण्याचे आदेश देण्याचा अधिकार राज्य माहिती आयोगाच्या अधिकार कक्षे बाहेर आहे व त्यामुळे अपीलकर्ती यांची विनंती मान्य करता येत नाही. अपीलकर्ती यांनी महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ प्रमाणे उपविभागीय अधिकारी यांना अर्ज करुन त्यांना न्याय मिळवून घेता येईल. अपीलकर्ती यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ती यांची विनंती ही माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीप्रमाणे मान्य करता येत नसल्यामुळे अपील खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर** **(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**दिनांक :- ९.७.२००८** **विदर्भ क्षेत्र, नागपूर.**